

चुकलेली संघ निवड

पराभवास जबाबदार... पान २


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ९५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१८ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# भयानक ! दुर्दैवी !! बसच्या अपघातात एकाच कुटुंबातील १८ जणांचा करुण अंत

## तीन पिढ्यांमधलं एकही वाचलं नाही...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, रियाद :** सौदी अरेबियातील मदीनाजवळ झालेल्या रस्ते अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ४२ भारतीय यात्रेकरूंमध्ये ९ मुलांसह एकाच कुटुंबातील १८ सदस्यांचा समावेश आहे. हैदराबाद येथील हे कुटुंब शनिवारी संध्याकाळी परतणार होतं, पण त्याआधीच कुटुंबातील सदस्य आसिफने सांगितलं की, 'माझी वहिनी, दीर, त्यांचा मुलगा, तीन मुली आणि त्यांची मुले उमराहसाठी गेले होते. ते आठ दिवसांपूर्वीच गेले होते. उमराह पूर्ण झाला होता आणि ते मदीनाला परतत होते. हा अपघात पहाटे १.३० वाजेच्या सुमारास झाला आणि बस आगीत जळून खाक झाली.

**नऊ वृद्ध आणि नऊ मुलं ठार**

या दुर्घटनेपूर्वी तो त्याच्या नातेवाईकांशी सतत संपर्कात होता, असंही आसिफने सांगितलं. 'एकाच कुटुंबातील १८ सदस्य, ९ वृद्ध आणि ९ मुलं, मृत्युमुखी पडले आहेत. ही आमच्यासाठी एक भयानक शोकांतिका आहे,' असं तो म्हणाला.

असिफने त्याच्या काही नातेवाईकांची ओळख पटवली, ज्यात नसिरुद्दीन (वय ७०), त्याची पत्नी अख्तर बेगम (वय ६२), मुलगा सलाहुद्दीन (वय ४२), मुली अमिना (वय ४४), रिझवाना (वय ३८) आणि शबाना (वय ४०) आणि त्यांची मुले यांचा समावेश आहे. कोणीतरी शेजाऱ्याकडून नसिरुद्दीन आणि त्याच्या



कुटुंबाच्या रामनगर येथील घराच्या चाव्या आणल्या आणि त्याची बहीण तिच्या भावाच्या घरात शिरताच मोठ्याने रडण्याचा आवाजा येऊ लागला.

**डिझेल टँकर धडकल्यानंतर बसला आग...**

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ४२ जणांपैकी बहुतेक जण हैदराबादचे होते. मिळालेल्या माहितीनुसार, ते ज्या बसमधून प्रवास करत होते ती मदिनापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर एका डिझेल टँकरशी धडकली. रात्री उशिरा बहुतेक प्रवासी झोपेत असताना हा अपघात झाला. त्यामुळे अपघातानंतर गाडीला आग लागल्याने त्यांना वेळेत बाहेर पडता आले नाही आणि त्यांचा तिथेच होरपळून मृत्यू झाला. या भीषण अपघातात एकाच कुटंबातील तब्बल १८ जणांचा मृत्यू झाला, म्हणजे एकाचवेळी ती पिढ्या उद्ध्वस्त झाल्या आहेत. हे सर्व हैदराबादमधील रहिवासी होते. 'रियाध येथील दूतावास आणि जेद्दाह कॉन्सुलेट प्रभावित लोकांना सर्वतोपरी मदत करत आहे', असं त्यांनी म्हटलं आहे. तसेच तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंथ रेड्डी यांनी सौदी अरेबियात मक्काहून मदिनाकडे जाणाऱ्या यात्रेकरूंच्या बस अपघाताच्या बातमीवर तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार अपघातात हैदराबादमधील काही नागरिकही सामील असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर, रेवंत रेड्डी यांनी मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांना संपूर्ण माहिती गोळा करण्याचे निर्देश दिले आहेत.

# इन्फोसिसची विज्ञान बस ग्रामीण विद्यार्थ्यांच्या दारी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञानाची प्रत्यक्ष ओळख होण्यासाठी इन्फोसिस कंपनीने उभारलेली अत्याधुनिक सायन्स लॅब बस जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रे खुर्द येथे दाखल झाली. धोत्रे खुर्द तसेच तुफानवस्ती येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात या चल प्रयोगशाळेला भेट देत विज्ञानाची अद्भुत सफर अनुभवली. या अभिनव उपक्रमासाठी मुख्य कार्यकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील आणि लोकल फंड सहाय्यक संचालक रमेश कासार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शिक्षण विभागाने पुढाकार घेतला. ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञानाचे प्रत्यक्ष प्रयोग दाखवून नवी दृष्टी देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे. सायन्स लॅब बसमध्ये प्रवेश करताच मुलांच्या डोळ्यांमध्ये उत्सुकतेची चमक दिसू लागली. डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित विविध प्रयोग, स्वतः हाताळण्याची उपकरणे, कार्यप्रणाली दाखवणारे मॉडेल्स आणि विज्ञानातील गुंतागुंतीच्या संकल्पनांचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण यामुळे विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा मनसोक्त आनंद घेतला.

शिक्षकांच्या मते, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची ओढ, आत्मविश्वास आणि उत्सुकता अधिक वृद्धिंगत झाली असून विज्ञानविषयक ज्ञानात लक्षणीय भर पडली आहे. ग्रामीण भागातील मुलांना प्रयोगशाळेचा थेट अनुभव देणारी ही बस म्हणजे खऱ्या अर्थाने चलती-बोलती विज्ञानशाळा ठरत आहे.

पालकांनीही इन्फोसिसच्या या सामाजिक उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाची नवसंकल्पना गावागावात पोहोचवणारी ही विज्ञान बस परिसरातील मुलांसाठी विशेष आकर्षण बनली आहे. इन्फोसिसच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाच्या जगाशी जोडणारा नवा मार्ग उपलब्ध झाला असून विद्यार्थ्यांच्या विज्ञान स्वप्नांना नवी उंच भरारी मिळत आहे.

# चारित्र्यावर संशय घेते गळा आवळून पत्नीची हत्या

**दि.१७, नागपूर :** पती-पत्नीचं नातं हे विश्वासावर घट्ट होत असतं. त्यांच्या प्रेमाच्या नात्याला समर्पण असतं. कितीही संकट आलं तरी जोडीदाराची साथ सोडायची नाही, अशी शपथ दोघांनी घेतलेली असते. एकमेकांच्यासोबत आनंदानं जीवन जगायचं असं दाम्पत्याचं ठरतं. अर्थात संसार करत असताना थोड्याफार कुरबुरी होतात. भांडण, तंटे होतात. पण या भांडणानंतर प्रेम आणखी जास्त घट्ट होतं. दोघे एकमेकांच्या जवळ येतात असं बोलतात. पण नागपूरच्या एका घटनेने सर्वच हादरले आहेत. कारण एका पतीने चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीसोबत वाद घातला आणि त्याचा शेवट खूप वाईट झाला.

चारित्र्यावर संशय घेत पतीने गळा आवळून पत्नीची हत्या केली. ही थरारक घटना मानकापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील न्यू गांधी लेआऊट परिसरात घडली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी पतीला अटक केली आहे. सुनील नारायण यदुवंशी (वय २६) असे अटकेतील पतीचे तर १९ वर्षीय मृतक पत्नीचे नाव राणी असं आहे. दोन वर्षांपूर्वी सुनीलचे राणीसोबत लग्न झाले. त्यांना आठ महिन्यांचे अपत्य आहे. कामाच्या शोधात सुनील हा पत्नी, आईसह नागपुरात आला. तो मानकापुरातील दावत लॉनमध्ये काम करायला लागला. तो येथेच खोली करुन राहत होता. बाजूलाच त्याची आई राहते. काही दिवसांपूर्वी राणी ही त्याला मोबाईलवर चॅटिंग करताना दिसली. त्याने तिच्यासोबत वाद घातला. त्यानंतर तो तिच्या चारित्र्यावर संशय घ्यायला लागला.

सुनील १४ नोव्हेंबरला रात्री घरी आला. यावेळी राणी ही मोबाईलवर बोलत होती. त्याला बघताच राणीने मोबाईल बंद केला. ती घाबरली. सुनीलने तिच्याकडून मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न केला. तिने प्रतिकार केला. सुनील संतापला. त्याने राणीला थापड मारली. राणीनेही त्याला मारहाण केली. धक्का देत सुनीलला खाली पाडले. त्यानंतर सुनीलने गळा आवळून राणीचा खून केला.

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर! राज्य सरकारचा मोठा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील महिलांची ई-केवायसी प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. या दरम्यान अलिकडे काही जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती, महिलांनी उपस्थित केलेल्या अडचणी लक्षात घेता, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचना आणि मार्गदर्शनाखाली ई-केवायसी करण्याची मुदत आता वाढवण्यात आली होती. याआधी ही मुदत १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निर्धारित अंतिम मुदत होती. पण निर्धारित मुदत आता वाढवण्यात आली आहे. आता महिला आपली ई-केवायसी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करु शकणार आहेत. कारण आता राज्य सरकारने ई-केवायसीची मुदतवाढ ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

ई-केवायसी करताना महिलांच्या आधारकार्डशी लिंक असणाऱ्या मोबाईल नंबरवर ओटीपी येतो. त्यानंतर महिलेच्या वडिलांच्या किंवा पतीच्या आधारकार्डवर लिंक असेलल्या नंबरवर दुसरा



ओटीपी येतो. त्यानंतरच ही ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण होत आहे. यामुळे महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक महिलांच्या वडील किंवा पतीच्या मोबाईलनंबरवर ओटीपी येत नसल्याची तक्रार येत होती. यावरही राज्य सरकारने उपाय शोधला आहे. तसेच अशाप्रकारच्या अनेक समस्यांसाठीच ई-केवायसीसाठीची मुदत वाढवण्यात आल्याचं मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. कोणत्याही लाभार्थी महिलेला याचा फटका बसू नये हा यामागचा प्रामाणिक हेतू सरकारचा आहे.

अलीकडील नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच काही महिलांच्या पती किंवा वडिलांचे निधन झाल्यामुळे संबंधित आधार क्रमांकावर ओटीपी प्राप्त होणे अशक्य झाले आहे.

अशा परिस्थितीत अपूर्ण ई-केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच, ज्या पात्र महिलांच्या पती किंवा वडील हयात नाहीत किंवा ज्या महिला घटस्फोटित आहेत अशांनी स्वत:ची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा माननीय न्यायालयाचा आदेश यांची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील, असं महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे.

या अनुषंगाने पात्र महिलांना न्याय मिळावा आणि कोणतीही पात्र महिला तांत्रिक किंवा अपरिहार्य कारणांमुळे योजनेपासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे. याकरिता माननीय मुख्यमंत्री आणि दोन्ही माननीय उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या हिताचे भान राखत ई-केवायसी प्रक्रियेस ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच विस्तारित कालावधीत लाभार्थींनी आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही मंत्री तटकरे यांनी केले आहे.

# मुंबई संघाची राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी




**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१७, मुंबई :** गुजरातमध्ये पार पडलेल्या १० व्या राष्ट्रीय सब ज्युनियर डॉजबॉल स्पर्धेत मुंबई संघाने प्रभावी आणि कौतुकास्पद कामगिरी करत तीन पदकांची कमाई केली.

विविध गटांतील सातत्यपूर्ण खेळ, अचूक रणनीती आणि संघभावना यांच्या जोरावर मुंबई संघाने राष्ट्रीय स्तरावर आपली भक्कम छाप उमटवली.

स्पर्धेत मुंबई मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक, तर मुंबई मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.तसेच मिक्स कॅटेगरीतही मुंबई संघाने द्वितीय क्रमांक मिळवून अप्रतिम कामगिरीची नोंद केली. तीनही विभागांमध्ये मुला- मुलींनी केलेले योगदान विशेष उल्लेखनीय ठरले.

**मुंबई मुलींचा संघ :**

हृदया सर्वे, गार्गी काळे, हारवी गाला, सारा सावंत, प्रांजली कदम, नेत्रा कंसारा, दुर्वा डापले, हेमाक्षी बामणे, अन्वी बुरीच्या, वैष्णवी वर्धन, तनुश्री सावंत, गौरी खोत, प्रलक्ष मोहारे, दाक्षी थोरात.

**मुंबई मुलांचा संघ :**

अंश रावल, अमय शिंदे, दर्शील वर्गीस, अश्मित गिरी, युग विश्वकर्मा, मेहान थाडेश्वर, रुद्र शिंदे, अरुस दास, शौर्य नाईक, वेदांत फडतरे, धैर्य मेवाडा, कृष्णा कोंडल, आदित्य सिंह.

मुंबई संघाचे मार्गदर्शक कोच राज बदी, समर्थ कदम, श्लोक अंचन, मनीष विश्वकर्मा आणि तानिया ठाकूर यांनी केले. खेळाडूंच्या समर्पण,परिश्रम आणि एकजुटीमुळे हे यश शक्य झाल्याचे प्रशिक्षकांनी सांगितले.

मुंबई संघाच्या या सन्माननीय यशाबद्दल भारतीय डॉजबॉल महासंघाचे सचिव पी. एस. बरार, टेक्निकल कमिटीचे अधिकारी डॉ. पाल, ख्वाजा अहमद, मुंबई डॉजबॉल असोसिएशनचे सचिव जगदीश अंचन, ऐश्वर्याताई शेटे तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू नरेश राऊत यांनी अभिनंदन करून खेळाडूंच्या मेहनतीचे आणि शिस्तीचे कौतुक केले.

स्पर्धेचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध रितीने करण्यात आले. गुजरात डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अल्हास पठाण, सचिव भावेश ठाकूर आणि पाटण जिल्हा सचिव गजेंद्र राजपूत यांनी उत्कृष्ट व्यवस्थापन करून संपूर्ण स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडली. राष्ट्रीय पातळीवरील या कामगिरीमुळे मुंबईचा डॉजबॉल क्षेत्रातील दबदबा आणखी भक्कम झाल्याची प्रतिक्रिया क्रीडा वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

# तीन वर्षाच्या चिमुकलीवर नराधमाकडून अत्याचार

**दि.१७, नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात संतापजनक घटना घडली आहे. काल रविवार रोजी रात्रीच्या सुमारास मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे एका ३ वर्षीय चिमुकलीवर एका नराधमाकडून अत्याचार करत तिचा निर्घुण खून केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनं मृत चिमुकलीच्या नातेवाईक आणि मालेगावकरांच्या मनात तीव्र संतापाची लाट उठली आहे. आरोपीला भर चौकात फाशी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे मन सुन्न करणारी घटना घडली असून प्राथमिक माहितीच्या आधारे एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून नंतर तिचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यानंतर संतप्त स्थानिक नागरिकांनी आणि नातेवाईकांनी मालेगाव सामान्य रुग्णालयात एकच गर्दी केली होती. मयत चिमुकलीच्या नातेवाईकांनी हंबरडा फोडत आरोपीला भर चौकात फाशी द्या, अशी मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी अत्याचार करून निर्घृण खून केलेल्या चिमुरडीचा मृतदेह हा मालेगाव सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला होता. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवून विजय खैरनार नामक संशयित आरोपीला अटक केली आहे.

## संपादकीय

### वर्दीतल्या बल्लवाचार्यांची कथा!

सूर्य पृथ्वीभोवती नव्हे तर पृथ्वीच सूर्याभोवती फिरते,' या ऐतिहासिक सूर्यसिद्धांताचे जनक, पोलंडचे खगोलशास्त्रज्ञ (निकोलस) कोपर्निकस यांच्या नावाच्या मार्गावरच्या राजधानी दिल्लीतल्या जुन्या महाराष्ट्र सदनात, त्यातही या सदनाच्या मागच्या बाजूच्या वाहनतळाजवळून तुम्ही भल्या सकाळी-संध्याकाळी चक्कर मारली तर वासानंच पोटोबा तृप्त व्हावा, अशी भावना होते. येथील उपहारगृहही तिथं जवळच आहे. पण त्या वेळात मसाल्यांचा, फोडणीचा वगैरे वास तिथून येत नसतो. मग त्याचा माग काढत काढत, बंद पडलेल्या एटीएम केंद्राच्या मागे गेलात तर आत एका खोलीत साक्षात अन्नपूर्णा अवतरल्याचं वातावरण असतं.

भाज्या चिरणं, फोडणी देणं, चपात्या- पराठ्यांचं पीठ मळणं, जेवण वाढणं अशी विविध कामं करणाऱ्या तरुणांची लगबग तिथं सुरू असते. कोणी भाजीला फोडणी, नव्हे तडका देत असतं, कांदे बटाटे चिरत असतं, एखाद्याला चपाती भाजताना चटका बसतो, कोणाचे कालच्या ड्यूटीतले अनुभव ऐकून मध्येच तिथं हास्यकल्लोळ उसळतो हे तरुण दुसरे तिसरे कोणी नसून जुने व कस्तुरबा गांधी मार्गावरचे नवीन, अशा दोन्ही महाराष्ट्र सदनांत २४ तास डोळ्यांत तेल घालून सुरक्षा देणारे महाराष्ट्र सुरक्षा दलाचे (एमएसएफ) करड्या गणवेशातले जवान असतात.

महाराष्ट्र सदन हे दिल्लीतलं आतिथ्य घर 'दगडांच्या देशा'चं राजधानीतील प्रतीक. राजधानीत लाल किल्ल्याच्या 'अंगणा'तल्या दहशतवादी हल्ल्याचा धसका ताजा असताना इंडिया गेटच्या 'ओसरी'वरच्या महाराष्ट्र सदनांसह महत्त्वाच्या वास्तूंची सुरक्षा हादेखील अती संवेदनशील विषय. महाराष्ट्र सदनांत रोज मेळावे, संमेलनं, महाराष्ट्रीय पदार्थ चाखण्यासाठी खास येणारे, असे नाना कळांचे शेकडो लोक येत असतात. इथल्या सुरक्षेची जबाबदारी असणारे हे जवान आपल्या घरापासून हजारो किलोमीटरवरच्या राजधानीत ड्युटी करतात.

दिल्लीतला जीवघेणा उन्हाळा, हाडं गोठवणारी थंडी, कधीही कोसळणारा सैराट पाऊस, दर हिवाळ्यातलं विषारी प्रदूषण अशा साऱ्या आव्हानांना झेलत हे जवान शब्दशः २४ तास दोन्ही सदनांच्या प्रवेशद्वारांवर खडा पहारा देतात. त्यातून कोण कधी, कोणाबद्दल प्रशासनाकडं तक्रार करील, याचा नेमच नाही इथं ! या वातावरणात सुरक्षा देणाऱ्या या जवानांची स्वयंपाकघरात 'ड्युटी' लागते तेव्हा त्यांच्या हातांतल्या भांडी-थाळ्या-परातींचा आवाजही 'घंटा किंकिणि नागरा,' असा मधुर भासतो त्या क्षणी! अर्थात व्हीव्हीआयपी मूव्हमेंट लागते तेव्हा स्वयंपाकघरात ड्यूटी लागलेल्यांनाही प्रसंगी सुरक्षेसाठी बोलावून घ्यावं लागतं. अखेर माणसंच आहेत ती, तेव्हा चोखपणे ड्यूटी बजावल्यावर, इतरांना उपद्रव न देता चार विरंगुळ्याच्या क्षणांचा आनंद त्यांनी घेतला तर कोणी नाक मुरडण्याचं कारण नाही ! मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यासाठी पोलिसांपेक्षा वेगळं सुरक्षा दल असावं, या विचारातून २०१०-११ मध्ये एमएसएफची स्थापना झाली. आता मुंबई लोकल सेवा, मेट्रोसह शासकीय रुग्णालयं, बऱ्याच शहरांतल्या विमानतळांसह अनेक ठिकाणी या दलाचे २० हजारांपेक्षा जास्त जवान तैनात आहेत. दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनाच्या सुरक्षेसाठी ४५ जवान व एक सहायक सुरक्षा अधिकारी असा ताफा असतो. दिल्लीत बाहेरचं जेवण रोज घेणं या सर्वांसाठी आर्थिकदृष्ट्या अशक्य. त्यामुळेच या जवानांनी स्वतःसाठीच एक छोटंसं स्वयंपाकघर उभारलं. ड्यूटीवर असतात त्याच शिस्तीनं व नियोजनबद्ध पद्धतीनं ते किचनचाही कारभार चालवतात ! दरमहा दोन मेस कमांडरर्सची नियुक्ती केली जाते. एक स्वयंपाकी असतोच, पण त्याला सर्व प्रकारची मदत करण्याचं काम हे जवान करतात. सकाळी सहा-साडेसहा आणि संध्याकाळी त्याच वेळेला ते जेवण बनवतात. कांदे-बटाटे कापण्यापासून चपात्या लाटणं-भाजणं, फोडणी देणं, भाज्या चिरणं, पीठ मळणं, नंतर भांडी घासून ठेवणं वगैरे कामंही ते करतात. रोज किमान ३० जवानांचं जेवण इथेच बनतं. प्रत्येकाकडून प्रत्येकी ३२०० रुपये घेतले जातात. दररोज दोन्ही वेळेस किमान १५-२० जवान इथंच जेवण करतात व जे त्या वेळी ड्युटीवर असतात त्यांना डबे जातात. जवळच्याच बाजारातून आठवड्याचा भाजीपालाही हेच जवान आणतात. निवासी आयुक्त आर. विमला वेळोवेळी स्नेहशील आस्थेनं या किचनची विचारपूस करतात. योगायोग पाहा या खाकी वर्दीतल्या बल्लवाचार्यांना अलीकडे प्रशासनिक अधिकारी मिळालेत त्यांचीही ओळख महाराष्ट्र नव्हे, भारतातील एक अग्रगण्य शेफ अशी आहे. सदनाचे सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे हे त्यांचं नाव. अलीकडेच भारत मंडपममधील भातावरील जागतिक प्रदर्शनात केंद्रीय अन्नप्रक्रिया मंत्रालयानं शेंडे यांना खास आमंत्रित केलं होतं.

# संघर्षाची चव नक्कीच असेल...

माझा मोबाईल बऱ्यापैकी किमतीचा आहे. त्याचा कॅमेरा अत्यंत उत्कृष्ट आहे. त्याने घेतलेले फोटो अत्यंत दर्जेदार पद्धतीचे येतात. फोटो पाहिल्यानंतर त्याचे ग्लीजिंग व त्याची सुबकता अक्षरशः नजरेत भरते.पण यामध्ये फार मोठा एक दोष आहे. हा अत्यंत चांगल्या क्वालिटीचा कॅमेरा असला तरी त्याने काढलेल्या फोटोमध्ये आलेल्या चेहऱ्याच्या पाठीमागच्या भाव-भावना, सुखदुःखाचे कवडसे किंवा आनंदाने मन भरून आल्याचे मनाचे प्रतिबिंब त्याला मात्र टिपता आलेले नाहीत. हे स्पष्ट जाणवते. दिसते व ते मनाला सलते.

तापोळा- महाबळेश्वर या रस्त्यावरती तुम्ही कधी प्रवास केला असेल तर महाबळेश्वर पासून सर्वसाधारण नऊ ते दहा किलोमीटर अंतरावरती म्हारोळे

नावाचा एक स्टॉप दिसतो. तिथून पुढे तीन वळणे घेतल्यानंतर घाटामध्ये प्लास्टिकच्या कागदापासून बनवलेले चौकोनी आकाराचे घर दिसते. पण ते घर नाही ते छोटेसे, वर्षानू वर्ष लोकांची सेवा करणारे, थंडी वाऱ्यात सोबत देणारे हॉटेल आहे. त्याला ना बोर्ड आहे, ना बसायची सोय आहे किंवा हॉटेल म्हणून काही वाटेल असा कोणताही त्याचा भाग नाही. रस्त्याच्या कडेला दरीच्या काठावर वर्षानुवर्ष उभे असलेलं चार बांबू वरती टिकलेले प्लास्टिकचे कव्हर टाकलेलं एक संघर्ष करणारे

कुटुंबाचे... आजीचे स्थान आहे. ते हॉटेल कसे आहे? त्या हॉटेलमध्ये काय मिळते. त्यामध्ये काय सोई सुविधा आहेत किंवा नाहीत हे सांगण्याचा हा विषय नाही. या ठिकाणी वर्षो न वर्ष वादळाला, पावसाला, कडाक्याच्या थंडीला आणि राईराई तापणाऱ्या मेच्या उन्हाला तोंड देत दगडावरती बसलेली एक आजीबाई तुम्हाला जाता येता हे बाबा चहा घेतोस का? किंवा अरे दादा कणीस गरम गरम भाजलेले आहे असा आवाज आल्यानंतर नकळत इकडे लक्ष जाते. या हृदयातून निघणाऱ्या, संघर्षमय आवाजाला दात देण्याचा हा विषय आहे.

मी जवळजवळ ३० वर्षापासून या म्हातारीला या ठिकाणी पाहतोय. पूर्वी जोडीने या ठिकाणी थांबायचे. निसर्गाने आपले काम केले. जोडीदार निघून गेला. एकटीच म्हातारी या ठिकाणी थांबलेली दिसते. काळ पुढे सरकत चालला आहे. गतीने चालणारी म्हातारी आता पाऊल टाकताना अडखळते. चेहऱ्यावरच्या सुरकुत्या स्पष्टपणे वय दर्शवत आहेत. मान थरथरला लागलेले आहे. शब्द अडखळाला सुरुवात झाली आहे. पण तरीही दररोज घरातून निघून या ठिकाणी येऊन, येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांना हात करून ये बाबा चहा घेतोस का? हे विचारणा करत असते.

> "जीवन संघर्ष इतका सहज सोपा नाही...

प्रत्येकाच्या आयुष्य आणि प्रत्येकाच्या आयुष्याचा प्रवास या संघर्षा विना पूर्णच होऊ शकत नाही. या वयामध्ये थरथरणाऱ्या हाताने,लटपटणाऱ्या पायाने, डोलणाऱ्या मानेला




सोबत घेऊन ही आजीबाई दररोज या हॉटेलच्या तोंडाला बसलेले असते. या हॉटेलची अवस्था बघितल्यानंतर कोणी पर्यटक थांबल्याचे दिसून येत नाही. आज चकाकणारी टेंबले, रंगरंगोटी केलेली इमारत आणि आकर्षक करणारे कप हॉटेलसाठी हवे असतात. हे इथे काहीच नाही. मग पर्यटक तरी कशाला थांबतील. सकाळी आणलेली दुधाची पिशवी अजूनही बाबा उघडलेले नाही संध्याकाळचे पाच वाजता ती मला सांगत होती . तरीही दरवाजा समोरच्या दगडावरती आजी बसून प्रत्येक गाडीला आवाज देऊन हात करत होती. मी नेहमीच येथे थांबतो. शक्यतो थाबण्याचा प्रयत्न करतो. मी या आजीकडे पाच-दहा मिनिटे थांबून तिच्याबरोबर बोलून पुढे जातो. पूर्वी मी चहा घ्यायचो. आता मला चहा नको असतो. पण तरीही मी तिला चहा सांगतो. चहाच्या पातेल्याला हात घालताच, मला चहा प्यायचा नाही हेही तीला मी सांगतो. आणि चहाचे दहा रुपये तिच्या हातावर ठेवून मी निघून जातो. पुढच्या वेळी मी परत येऊन तिथे थांबतो. माझी अपेक्षा असते तिने मला ओळखावे, पण तसे होत नाही. ती ओळखत नाही याचाही आनंद वाटतो. स्मृती कमी होत चाललेली आहे हे जाणवते. मी परत एकदा चहा सांगतो. ती चहाच्या पातेलेला हात घालताच मला चहा प्यायचा नाही हेही सांगतो आणि चहाचे दहा रुपये देऊन मी तिथून निघून जातो. हा सिरस्ता माझ्या घरच्यानाही माहित झालाय. मग घरून निघताना दोन चपात्या बांधून घेतात, आजीच्या हातावर ठेवतात आणि आम्ही पुढच्या प्रवास निघून जातो.

कधीकधी विचारांचं काहूर मनामध्ये निर्माण होते. हे जीवन आहे. हे असंच चालायचं. कुणाच्या वाटेला सरळ रस्ता असेल कोणाच्या वाटेला हा असा खडबडीत रस्ता असेल. पण चालणं कधी थांबलेलं नाही.

कधी या महाबळेश्वर तापोळा रस्त्यावरून जर तुमचा प्रवास असेल तर आवर्जून या ठिकाणी थांबा. या म्हातारीच्या हातचा आवर्जून चहा प्या. थंडीच्या दिवसांमध्ये एक मक्याचे कणीस घेऊन पुढे निघून जावा. चकाकणाऱ्या हॉटेलमध्ये आपण नेहमी चहा पीत असतो. कधीतरी या खडकाशी संघर्ष करणाऱ्या दरीमध्ये डोकावणाऱ्या, वर्षानुवर्ष दगडावरती बसून तुम्हाला हात करणाऱ्या आजीच्या हातचा चहा प्या. एक वेगळी चव आहे. आपुलकीचा असेल, कि मायेचा असेल माहित नाही. हे माहित नसलं तरी संघर्षाची चव तर याला नक्कीच जाणवेल, हे मात्र निश्चित.

**✻ आपला ✻**
**- राम पडगे, तापोळा/महाबळेश्वर**

# कुमारवयातील प्रेमप्रकरणे : वास्तव आणि जबाबदारी

माध्यमिक शाळेमधील शिक्षकांपुढे कमी वयात मुला-मुलींमध्ये घडणारी प्रेमप्रकरणे कशी हाताळायची हा मोठा प्रश्न उभा असतो. साधारणतः वय वर्षे १२ ते १९ या कालखंडातील कुमार अवस्था ही खरोखरच वादळी असते. या काळात मुलांचे वर्तन अस्थिर, चंचल आणि भावनिकदृष्ट्या अतिसंवेदनशील असते. या अवस्थेला यौवनारंभ असेही म्हणतात. या काळात मुला-मुलींमध्ये विशेष शारीरिक, मानसिक आणि जैविक बदल घडत असतात.

या वयात कोणतीही बंधने नकोशी वाटतात. मानसिक विकास झपाट्याने होत असतो. कर्तृत्वापेक्षा सौंदर्याकडे ओढ वाढत जाते. आपण आकर्षक दिसावे, लक्ष वेधून घ्यावे अशी इच्छा मनात जोर धरते. या साऱ्या प्रक्रियेमुळे ही मुले अनेकदा गोंधळलेल्या अवस्थेत असतात. त्यातच विरोधलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण ही नैसर्गिक भावना या वयात उत्पन्न होऊन ती अधिक तीव्र बनते. बालकही नाही आणि पूर्ण प्रौढही नाही अशा मधल्या अवस्थेत ही मुले अनेकदा बंडखोरी करण्याकडे वळतात.

काही मुले त्यांच्या भावनांचे दमन करण्यासाठी दिवास्वप्नांचा आधार घेतात; तर आजच्या मुक्त वातावरणामुळे, सोशल मीडिया आणि मोबाईलच्या वापरामुळे बरीच मुले आपल्या भावनांना मोकळा प्रवाह देण्याचे धाडस करतात. यातून अनेकदा गंभीर परिस्थिती उद्भवतात.

या वयात निर्माण होणाऱ्या प्रेमसंबंधांचा त्यांच्या शैक्षणिक जीवनावर मोठा परिणाम होताना दिसतो. ज्या वयात शिक्षण, करिअर आणि भविष्याची पायाभरणी व्हायला हवी, त्याच वयात भावनिक गुंतलेपणामुळे एकूणच जीवनाला धोकादायक वळण लागण्याची शक्यता असते.

शाळेमधील शिक्षकांना जेव्हा अशा प्रकरणांची 'कुणकुण' लागते, तेव्हा त्यांच्याकडे हे हाताळण्यासाठी शास्त्रीय किंवा मनोवैज्ञानिक प्रशिक्षण नसते. त्यामुळे टोमणे मारणे, उघडपणे रागावणे किंवा कधी कधी मारहाण करून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळा पालकांना समजल्यावर विशेषतः मुलीचे शिक्षण थांबवले जाते किंवा वाद-भांडणे, मारहाणीचे प्रसंग घडतात. काही प्रकरणे तर पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचतात.

पूर्वी सोशल मीडिया नसल्याने ही प्रकरणे 'नजरा-नजर', 'ओझरते स्मित' ते 'प्रेमपत्र' इतपतच मर्यादित असायची. परंतु आज उत्तेजन वाढवणारे सोशल मीडिया, वेब सीरिज आणि भावनांना ढवळून काढणारी गाणी यामुळे मुला-मुलींचा तोल सहज ढळतो.

प्रेम ही पवित्र भावना आहे, पण त्यात वयाची परिपक्वता अत्यंत आवश्यक असते. केवळ आकर्षणाला प्रेम समजण्याची चूक धोकादायक ठरते. या वयातील मुले परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करू शकत नाहीत. शारीरिक जवळीक साधण्याची इच्छा निर्माण होते, आणि ते अधिक धोकादायक ठरू शकते.

मराठी सिनेमातील एक गीत या भावना स्पष्टपणे दर्शवते. तरुणपणाच्या रस्त्यावरचं पहिलं ठिकाण नाक्याचं, सोळावं वरीस धोक्याचं...

या गीतात या वयात मनात जन्मणाऱ्या भावना किती गुंतागुंतीच्या असतात हे सुंदरपणे मांडले आहे. म्हणून या वयात होणाऱ्या बदलांविषयी मुलांना योग्य माहिती, मार्गदर्शन आणि शास्त्रीय शिक्षण देणे आवश्यक आहे. शरीरातील, मनातील बदलांकडे तटस्थपणे पाहण्याचा सल्ला वडीलधाऱ्यांनी दिला पाहिजे. प्रेमप्रकरण उद्भवल्यास शिक्षक आणि पालकांनी शांतपणे, संयमानं आणि समजून घेऊन त्या मुलांचे समुपदेशन तज्ञांकडून केले पाहिजे. मारहाण किंवा शिक्षा देणे यामुळे परिस्थिती आणखी बिघडते. अशी प्रकरणे हळुवारपणे, संवादाने आणि वैज्ञानिक पद्धतीने हाताळली गेली पाहिजेत.

कुमारवयातील प्रेम ही चूक नसून नैसर्गिक प्रक्रिया आहे; चूक फक्त तिचे अज्ञानात केलेले व्यवस्थापन आहे. शिक्षक, पालक आणि समाज यांनी एकमेकांशी सहयोग करून मुलांना योग्य मार्गदर्शन दिले, तर ते भटकणार नाहीत.तर फुलेसारखे उमलतील. त्यांच्यातील भावना दाबण्याऐवजी समजून घेऊ या; कारण योग्य समज आणि संवादच भविष्यातील संकटांना रोखू शकतो.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## संशयाची सुई..

ई व्ही एम वर परत
रोखे संशयाची सुई
नव तंत्र ज्ञान चुकले
चुलीत गेल्यात सोई

अवचित हारपदरात
आठवते आता आई
नामुष्कीचे खापर हे
कुणांवर फोडावेबाई

बॅलेट पेपर रद्दी मध्ये
वाळली शिक्काशाई
संभ्रमात वेढूनि जाते
हतबध्द रे लोकशाही

संघटना एक वटल्या
वाढे निषेध ठाई ठाई
आग पाखड चालली
पुरावे कसलेही नाही

पराभव असह्य होई
भांडे सरसावूनि बाही
आरोप करे अद्वातद्वा
बोलतात काही बाही

मशीनमागची माणसे
नेहमी अंधारात राही
विजय कसा मिळावा
क्षितिज पल्याड पाही

लाव एकदा सोक्षमोक्ष
संभ्रम राहू नये काही
इतर समस्या प्रलंबित
जनता होई त्राही त्राही

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# चुकलेली संघ निवड पराभवास जबाबदार

दक्षिण आफ्रिकन क्रिकेट संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून या दौऱ्यातील पहिला कसोटी सामना कोलकाता येथील ईडन गार्डनच्या मैदानावर खेळला गेला. या पहिल्या कसोटीत भारत दक्षिण आफ्रिकेला सहज नमवून मालिके १- ० अशी आघाडी घेईल अशी अपेक्षा क्रिकेट प्रेमींना होती मात्र प्रत्यक्षात उलटेच घडले. या कसोटीत दक्षिण आफ्रिकन संघानेच भारतीय संघाचा ३० धावांनी आश्चर्यकारक पराभव केला. रविवारी कसोटीच्या तिसऱ्या दिवशी चौथ्या डावात भारतीय संघाला विजयासाठी आवश्यक असणाऱ्या अवघ्या १२३ धावा काढता न आल्याने मानहानीकारक पराभवास सामोरे जावे लागले. भारतीय संघाचा हा पराभव का झाला याची चर्चा क्रिकेट विश्वात रंगू लागली आहे. काहीजण या पराभवास खेळपट्टीस जबाबदार धरत आहे. संघ व्यवस्थापनाने अद्याप या पराभवाचे विश्लेषण केले नसले तरी ते ही या पराभवास खेळपट्टीस जबाबदार धरत आहे असे त्यांच्या एकूण देहबोलीवरून वाटते. संघ व्यवस्थापन खेळपट्टीस जबाबदार धरून स्वतःवरील जबाबदारी झटकत आहे. ही कसोटी ज्या खेळपट्टीवर खेळवण्यात आली होती ती फिरकीस धार्जिणी होती हे मान्य केले तरी याच खेळपट्टीवर पाहुण्या दक्षिण आफ्रिकन फलंदाजांनी भारताच्या चार फिरकी गोलंदाजांना तोंड देत पहिल्या डावात दीडशतकी व दुसऱ्या डावात शतकी धावा काढल्या. त्यांचा कर्णधार टेंबा बवुमा याने याच खेळपट्टीवर नांगर टाकून धीरोदत्तपणे अर्धशतक झळकावले. भारतीय फलंदाजांना मात्र या धावा काढताना नाकी नऊ आल्या कारण या कसोटीसाठी जी संघाची निवड करण्यात आली होती तीच मुळात चुकीची होती. भारतीय संघात चार फिरकी गोलंदाज आणि दोन वेगवान गोलंदाज खेळवण्यात आले होते. भारतीय संघात तीन दर्जेदार फिरकी आणि दोन वेगवान गोलंदाज असताना चौथ्या फिरकी गोलंदाजांची गरज नव्हती त्या ऐवजी एक स्पेशालिस्ट फलंदाज खेळवला असता तर त्याचा संघास फायदा झाला असता. त्यात कर्णधार शुभमन गिल जायबंदी झाल्याने भारताचा आणखी एक फलंदाज कमी झाला त्याचाही फटका भारतीय संघाला बसला. कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजीतील तिसरा क्रमांक हा खूप महत्वाचा असतो. या क्रमांकावर खेळणारा फलंदाज हा संघाचा कणा असतो. संघ अडचणीत असताना एक बाजू लावून धरत धावफलक हलता ठेवण्याची जबाबदारी त्याची असते. राहुल द्रविड आणि चेतेश्वर पुजारा यांनी ही जबाबदारी चोख पार पाडली पण आता त्या क्रमांकावर चक्क फिरकी गोलंदाजाला खेळवण्यात येत आहे. संघ व्यवस्थापनाचा हा निर्णय चुकीचाच नव्हे तर मूर्खपणाचा वाटतो. हा संघ कसोटीसाठी निवडला आहे की टी २० साठी हेच समजत नाही कारण कसोटीत धावा करण्यासाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. ऋतुराज गायकवाड, श्रेयस अय्यर, साई सुदर्शन, अजिंक्य रहाणे यांच्याकडे कसोटी क्रिकेटचे तंत्र आहे पण त्यांच्याकडे संघ व्यवस्थापन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. संघ व्यवस्थापनाच्या याच चुकीमुळे न्यूझीलंडने भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश दिला होता. मागील वर्षी न्यूझीलंडने भारताला भारतात येईन ३ - ० ने हरवले होते. तेव्हाही न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांपुढे भारतीय फलंदाजी नांगी टाकली होती. आता त्याचीच पुनरावृत्ती दक्षिण आफ्रिका करतो की काय अशी भीती वाटते. कारण भारत प्रतिस्पर्धी संघासाठी फिरकीचे जाळे विणतो आणि या जाळ्यात स्वतःच अडकतो. न्यूझीलंड नंतर दक्षिण आफ्रिकन फिरकी गोलंदाजांनीही हे दाखवून दिले आहे. भारतीय फलंदाजांकडे फिरकी गोलंदाजी खेळण्याचे तंत्र नाही जी भारतीय फलंदाजी फिरकी खेळण्यास सर्वात सक्षम मानली जात होती तीच भारतीय फलंदाजी फिरकी गोलंदाजीपुढे कोलमडताना पाहणे खेदजनक आहे. आता दुसऱ्या कसोटीत तरी संघ व्यवस्थापनाने योग्य खेळाडूंची निवड करावी अन्यथा दक्षिण आफ्रिका देखील भारताला भारतात येऊन वाईट वॉश देण्याचा भीम पराक्रम करू शकतो.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सुभाष पाटील यांचे १५४ व्या आंतरराष्ट्रीय तायक्वांन्डो पंच परीक्षेत नेत्रदीपक यश



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१७, मुंबई :** मतासफा इस्वातीनी (साउथ आफ्रिकेचा पुढे देश आहे) येथील इसीबयेनी रीसॉट येथे दिनांक १२ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या १५४ व्या आंतरराष्ट्रीय क्यूरोगी व पॅरा तायक्वॉन्डो पंच परीक्षेत भारतातून एकमेव रायगड व नवी मुंबई चे आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुभाष पाटील यांनी सहभाग नोंदविला होता. या आंतरराष्ट्रीय परीक्षा सेमिनार मधून सुभाष पाटील यांना पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक स्पर्धाचे नवीन नियम व पॅरा (अंपगांची स्पर्धा) कशा पद्धतीने घेतात. त्याचे नियम शिकवण्यात आले. या पंच परीक्षेत सुभाष पाटील यांची लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, शारीरिक परीक्षा व पॉइंट कशा प्रकारे द्यायचे या चाचण्या घेण्यात आल्या. या सर्व चाचण्यामध्ये सुभाष पाटील यांनी आंतरराष्ट्रीय सेमिनार (नविन नियम) व पंच परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करून पंच परीक्षा उत्तीर्ण झाले.सुभाष पाटील यांना इटली देशातील पंच परीक्षक ब्रुनो ब्रुगाननो व वर्ल्ड तायक्वॉन्डो पॅरा आंतरराष्ट्रीय कमिटीचे अध्यक्ष उस्मान दिलदार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सुभाष पाटील यांनी अनेक देशात जाऊन आंतरराष्ट्रीय रीफ्रेशर पंच परीक्षा दिल्या व अनेक देशात जागतिक तायक्वॉन्डो स्पर्धेत पंच म्हणून काम पाहिले आहे. सुभाष पाटील हे सर्व नियम भारतातील पंचाना शिकवुन भारतामध्ये चांगले आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत. यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले. सुभाष पाटील यांनी मिळविलेल्या या यशासाठी तायक्वॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया, तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई व रायगड चे पदाधिकारी व इतर मान्यवर, सर्व प्राचार्य यांनी अभिनंदन करून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## तवा आश्रम शाळेत केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेला उत्साहात सुरुवात



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१७, डहाणू (पालघर) :** आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत शासकीय आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांना सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी तवा आश्रम शाळेत मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या स्पर्धांमध्ये तवा, नानिवली, मेंढवण, महालक्ष्मी, कांदरवाडी, नागझरी, चिंचले, धुंदलवाडी आदी केंद्रातील शाळांच्या एकूण ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. तीन दिवस चालणाऱ्या क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धांमध्ये, कबड्डी, खो-खो, धावणे, रिले, गोळाफेक, भालाफेक, लांब उडी - उंच उडी सह अनेक ॲथलेटिक्स प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना आपली क्षमता दाखवण्याची संधी उपलब्ध होणार आहे. उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन करत मैदानावर त्यानंतर क्रीडा मशाल प्रज्वलन आणि क्रीडा शपथविधी घेऊन स्पर्धांचा विधिवत शुभारंभ झाला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर क्रीडा वृत्तीची चमक दिसत होती. उद्घाटन कार्यक्रमाला अविनाश मांदळे, पोलीस निरीक्षक, कासा पोलीस ठाणे लहू बालशी, सरपंच, तवा ग्रामपंचायत संतोष सागर, मुख्याध्यापक, तवा आश्रम शाळा उल्हास सातवी, मुख्याध्यापक, धुंदलवाडी आश्रम शाळा तसेच सहभागी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि क्रीडा शिक्षक यांचीही उपस्थिती लाभली. प्रस्ताविक मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करत सांगितले. अभ्यासाबरोबर क्रीडा ही तितकीच महत्त्वाची आहे. या स्पर्धांमुळे तुमच्यातील सुप्त क्षमता जागृत होते आणि त्यातूनच अनेक विद्यार्थी तालुका, जिल्हा, राज्य अशा उच्च पातळीवर पोहोचतात. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिस्त, मेहनत, संघभावना आणि आरोग्य यांचे महत्त्व अधोरेखित करून या संधीचा उपयोग करून घेण्याचे आवाहन केले. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी क्रीडांगण उत्साहाने दुमदुमले असून विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण सहभागामुळे वातावरणात प्रचंड ऊर्जा जाणवत आहे. पुढील दोन दिवसांमध्ये विविध क्रीडा प्रकारांचे सामने रंगणार आहेत.

## बारड हायस्कूलच्या विद्यार्थिनींचा विभागीय बेसबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** बारड येथे केवळ शिक्षणातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थिनींनी चमक दाखवत आहेत. जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूलच्या मुलींच्या बेसबॉल संघाने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवत लातूर येथे झालेल्या विभागीय बेसबॉल स्पर्धेत अव्वल स्थान पटकावले.लातूर क्रीडा संकुलावर नुकत्याच पार पडलेल्या १७ वर्षे वयोगटातील स्पर्धेत बारडच्या मुलींनी दमदार खेळ करून लातूरच्या संघाचा पराभव करत विभागीय विजेतेपद आपल्या नावे केले. या विजयानंतर संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून गावात आनंदाचे वातावरण आहे.विजयानंतर ग्रामस्थ व प्रशालेच्या वतीने खेळाडूंचा शालेय साहित्य व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या आनंदसोहळ्यास भाजपा सरचिटणीस बाळासाहेब देशमुख, उपसरपंच प्रदीप देशमुख, चेअरमन अनिल देशमुख, मु.अ.शुभांगिणी तळणकर, सुमिता मेटकर, क्रीडा शिक्षक बाबुराव कुलूपवाड, संतोष राऊत, शा.व्य.स. उपाध्यक्ष दौलत शेख, दिगांबर टिप्परसे, दिगांबर कदम, देवराव देशमुख, जी.एस. सय्यद, शिवाजी बुरडे, अनिल मुपडे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक संतोष राऊत यांनी कुशलतेने केले तर आभार प्रदर्शन मु.अ. शुभांगिणी तळणकर यांनी मानले.बारड हायस्कूलच्या या विजयी मुलींनी राज्यस्तरावर ही अशीच चमक दाखवण्याच्या निर्धाराने सरावला सुरुवात केली आहे. गावकऱ्यांसह सर्वांच्या शुभेच्छांचा वर्षाव त्यांच्यावर होत आहे.

# पालघरच्या आदिवासी युट्युब कलाकारांचा राज्यस्तरीय आदिवासी पारंपरिक नृत्य स्पर्धेत अभूतपूर्व विजय

## तारपा नृत्याने जिंकली राज्यभराची मनं; प्रथम क्रमांक व 3 लाखांचे पारितोषिक



> आम्ही फक्त युट्युबवर गाणी काढून मनोरंजन करत नाही; तर पालघरची आदिवासी संस्कृती, तिची परंपरा, वेशभूषा आणि कला जगभर पोहोचवण्याचे कार्य करतो. तारपा नृत्य हे आपल्या समुदायाचे ओळखचिन्ह आहे. तरुण पिढीने पुढे येऊन आपल्या संस्कृतीचे संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.
>
> **- रवी सातपुते**

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१७, पालघर :** धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आणि भगवान बिरसा कला संगम यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे राज्यस्तरीय आदिवासी पारंपरिक सांस्कृतिक स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले. या महोत्सवात आदिवासी नृत्य, वाद्य वादन, गायन, रील्स, ब्लॉग, चित्रकला, छायाचित्रण, डॉक्युमेंटरी अशा एकूण ९ विभागांतील स्पर्धा घेण्यात आल्या. यासाठी राज्याला कोकण, नाशिक, धुळे, गडचिरोली आणि विदर्भ अशा पाच विभागांत विभागून प्राथमिक फेऱ्या घेण्यात आल्या.

प्रथम ऑनलाइन फेरीतून पात्र झालेल्या नंतर, विभागीय फेरीत २४,००० स्पर्धकांनी सहभाग घेतला. यामधून ९०० उत्कृष्ट कलाकारांची निवड राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी झाली. कोकण विभागातून रवी सातपुते आणि त्यांचा ग्रुप हे तारपा नृत्यासाठी निवडले गेले. या पथकात एकूण १५ कलाकारांचा समावेश होता यामध्ये रवी सातपुते आर.बी. राऊत किरण वरठा राजेश माससमारे अनिल राऊत कृष्णा ठाकरे (तारपकरी), अरुण काकड, मधुकर खरपडे, लक्ष्मी सातवी, प्रिती भोये, अर्चना रावते समू टोकरे, विशाखा दुबळा, अस्मिता कदम राणी वातास होते. संपूर्ण महाराष्ट्रातून अंतिम फेरीसाठी फक्त २० नृत्य पथके निवडली गेली होती. अत्यंत साधी, पारंपरिक आदिवासी वेशभूषा आणि शिस्तबद्ध तालात सादर केलेल्या पालघरच्या तारपा नृत्याने प्रेक्षकांची आणि परीक्षकांची मनं जिंकली.

**राज्यात 'तारपा'चा जलवा –** प्रथम क्रमांकाची मुकुटमणी उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर रवी सातपुते आणि त्यांच्या पथकाने राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावला, आणि त्यांना ३ लाख रुपये पारितोषिक व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. नागपूरच्या मंचावर पालघरच्या संस्कृतीचा अभिमानाने उठलेला नाद सर्वत्र दुमदुमला. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## साईकृपा विद्यालय चिंतलधाबा येथे माजी विद्यार्थी संग स्थापन करण्यासंबंधी सहविचार सभा संपन्न



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१७, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** शाळा ही केवळ शिक्षणाची जागा नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगी व्यक्तिमत्व विकासाचे केंद्र असते. शाळेतून मिळालेले ज्ञान संस्कार व मूल्यावर विद्यार्थ्यांचे पुढील जीवन प्रवास उभा राहतो.

जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक तसेच खाद्यकीय शाळेतील शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी प्रशासन समाजकारण संशोधन व्यापार शेती उद्योग क्षेत्रात नेत्रदीप प्रगती करीत असल्याचे दिसून येते यासोबत राष्ट्र उभारणीसाठी योगदान देत आहे. शाळेतून त्यांच्या झालेल्या घडणीची जाणीव ठेवून माझी विद्यार्थी शाळेबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी शाळेच्या विकासात महत्त्वाचा हातभार लावत असतात. या माजी विद्यार्थ्यांच्या सहयोगातून शाळेच्या गुणवत्ता विकासास चांगल्या प्रकारे चालला मिळू शकते व विकासासाठी विविध प्रकारे मोलाचेयोगदान करीत असतात.

या सर्व बाबीचा विचार करता महाराष्ट्र राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच खाजगी शाळांमध्ये माजी विद्यार्थीसंघ स्थापन करणे व माजी विद्यार्थी मेळावे आयोजित करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

या आधारे साईकृपा विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील यांनी माझी विद्यार्थी संघ स्थापन करण्याबाबत व माजी विद्यार्थी मेळावे, स्नेहसंमेलन आयोजित करण्याकरिता सभा आयोजित केली होती सभेत माजी विद्यार्थी समिति स्थापन करण्यात आली. अध्यक्ष अरुण कुत्तरमारे, उपाध्यक्ष मीनाक्षी बोडेकर, सचिव डी.के.पाटील, मुख्याध्यापक, कोषाध्यक्ष महेंद्र ठेंगणे, सदस्य जावेद शेख, विशाल कट, कमवार प्रदीप वासेकर, वर्षा कटकमवार, माहेश्वरी पिंपळशेंडे, प्रमोद खांडरे, प्रमोद मळावी, निखिल ठुशे, दिनेश वडसकर, हरी राजुरकर,उपरोक्त समिति स्थापन करून नवनियुक्त अध्यक्ष उपाध्यक्ष कोषाध्यक्ष ची आणि सर्व सदस्यांची पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रत्येकानी आपल्या बॅचमधील विद्यार्थ्यांची माहिती दिली गप्पागोष्टी करून फोटो सेशन केले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## संकल्प संस्था आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, मुंबई :** सामाजिक क्षेत्रात कायमस्वरूपी नवनवीन उपक्रम करणाऱ्या व सामाजिक कार्यकर्त्यांची मातृसंस्था म्हणून ओळखली जाणाऱ्या संकल्प संस्थेच्या वतीने आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाच्या पाचव्या बॅचचा उद्घाटन समारंभ दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी पंत वालावलकर स्कूल, नेहरू नगर, कुर्ला (पू.) येथे मोठ्या उत्साहात पार पडला. सदर प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित अक्षयशक्ती फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.नारायण अय्यर व मैत्री संस्थेचे अध्यक्ष सुरज भोईर यांच्या शुभहस्ते संकल्प संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेह कासारे यांनी पहाडी व भारदस्त आवाजात सादर केले तर सविता हेंडवे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. पाहुण्यांचा परिचय वनिता सावंत यांनी करून दिला तसेच दीपा गमरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. स्वाती पाटील आणि वनिता सावंत यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाला मंत्रमुग्ध करणारी सुरेल अशी सुरुवात मिळाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे डॉ. अय्यर आणि सुरज भोईर यांनी आपल्या मनोगतातून प्रशिक्षणार्थींना सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारी अधोरेखित करत समाज विकासासाठी संवेदनशीलतेने आणि प्रामाणिकपणे काम करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून सक्षम कार्यकर्त्यांची निर्मिती व्हावी, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. सदर उद्घाटन सोहळा यशस्वी करण्यात अथक परिश्रम घेणाऱ्या स्वाती पाटील, सोनाली कांबळे, अविनाश पाटील आणि सूर्यकांत चव्हाण यांचे तसेच प्रशिक्षणार्थी व उपस्थितांचे आभार मानून सुवर्णा बामणे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# पत्रकार प्रमोद दिवेकर यांना जीवे मारण्याची धमकी

## आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पुणे :** माझ्या फेसबुकवर फेसबुक पोस्टला मृगजळ अशी कमेंट केली. म्हणून रागाने अतिशय खालच्या भाषेत अश्लील शिवीगाळ करून तुला व तुझ्या कुटुंबाला संपवतो अशी धमकी देत थरकाप उडवणारा प्रकार पुणे शहर उघडकीस आला आहे.

पारनेरचे भूमिपुत्र पुणे येथील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते पत्रकार प्रमोद संजय दिवेकर (वय ३६, रा.पेरणे फाटा, हवेली) यांच्यावर ही धमकी देण्यात आली असून, याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी हेमंत जाधव (रा.छत्रपती संभाजी नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्रमोद दिवेकर हे सामाजिकतासाठी सतत झटणारे कार्यकर्ते असून, त्यांनी छत्रपती संभाजी नगर येथील हेमंत जाधव या व्यक्तीने दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८ वाजता कॉल करून फेसबुक पोस्ट वर केलेल्या कमेंटची माहिती विचारली असता प्रमोद दिवेकर यांनी सविस्तर माहिती दिली.

परंतु पोस्ट वर कमेंट केलीच का?

असा राग व्यक्त करत हेमंत जाधव या व्यक्तीने फोनवर व व्हाट्सअप मेसेज द्वारे शिवीगाळ करत प्रमोद दिवेकर यांना व त्यांचा कुटुंबाला जीवे मारतो अशी धमकी देण्यात आली. या संदर्भात सदर व्यक्ती विरोधात लोणीकंद पोलीस स्टेशन येथे कलम ३५२, ३५१ (२) (३) अंतर्गत गुन्हा नोंदवून तपासाचे काम पोलिस उपनिरीक्षक दिलिप पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली हवलदार टि.ए.कांबळे यांच्याकडे सोपवला आहे. या सर्व प्रकरणाच्या मागे सुतार समाज्यातील एका नेत्याचा हात असल्याचा संशय प्रमोद दिवेकर यांनी व्यक्त केला आहे.


या घटनेनंतर हवेली परिसरासह पारनेर तालुक्यात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते पत्रकार प्रमोद दिवेकर यांना धमकावणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जावी. अशी मागणी नागरिकांसह पत्रकार आणि सामाजिक संघटनांकडून जोर धरू लागली आहे.

# पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, पनवेल :** राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त निर्देशांनुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी १४ प्रभागांचा समावेश करून फेर सोडत काढण्याचे व त्या अनुषंगाने सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी जागा नेम न देण्याचे बाबत पनवेल महापालिकेकडून दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी ११ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोडती द्वारे आरक्षण काढण्यात आले. पनवेल महापालिकेच्या सन २०२५ मधील सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण सोडत निश्चित करण्याची प्रक्रिया दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडली होती.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या पत्रानुसार, एकूण १४ प्रभागामधील (प्रभाग क्र. १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, १०, १३, १४, १६, १९, २०) जागांचा समावेश करुन नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांच्या ६ जागांची सोडत काढण्याची कार्यवाही शासनाने दि.२० मे २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या नियमातील तरतुदीनुसार करण्याचे आदेश दिले होते. तसेच सर्वसाधारण महिलांच्या जागांचे आरक्षण देखील नियमानुसार नेमून देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज सोडत काढण्यात आली. यामध्ये प्रभाग ९- ब, प्रभाग १२- ब, प्रभाग १५- ब, प्रभाग १७- ब, प्रभाग १८- अ, या जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गातील




महिलांकरिता थेट आरक्षित करण्यात आल्या. तसेच आजच्या सोडतीमध्ये प्रभाग १- अ, प्रभाग २ –अ, प्रभाग ३- ब, प्रभाग १३- ब, प्रभाग १६- अ, प्रभाग १९– अ या जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरीता आरक्षित झाले.

**प्रारुप आरक्षण, हरकती व सूचना १९ नोव्हेंबर पासून स्वीकारणार**

सुधारित प्रारूप आरक्षणावरती नागरिकांकडून येणाऱ्या हरकती व सूचना १९ नोव्हेंबर २०२५ पासून स्वीकारल्या जाणार आहेत. या हरकती २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत स्वीकारल्या जाणार आहेत.

**हरकती दाखल करण्यासाठी मुख्यालयात व्यवस्था**

हरकती व सूचना दाखल करण्यासाठी इच्छुकांनी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात (नागरी सुविधा केंद्र) लेखी अर्ज दाखल करावेत.

# थोडक्यात

## वाशी विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने वाशी विभागात निष्कासनाची कारवाई केली. वाशी विभाग कार्यक्षेत्रातील वाशीगाव, जागृतेश्वर मंदिराच्या मागे उच्च दाबाच्या वाहीनीखाली येथे बेकायदेशीर अनधिकृत झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत. सदर अनधिकृत झोपडपट्ट्यांवर दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सी विभाग वाशी कार्यालयामार्फत तोडक कारवाई करुन अंदाजे ८९ ते ९९ अनाधिकृत झोपड्या, ७ भंगार गोडाऊन व गॅरेज निष्कासित करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुखदेव येडवे, वाशी विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच स्थानिक पोलीस, अतिक्रमण पोलीस, मजूर व जेसीबी च्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# भोंदू बडेबाबा विरोधात जादूटोणा विरोधी कायद्याचे कलम लावा - अंनिसची मागणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** गणेश जयराम जगताप उर्फ बडे बाबा पाथर्डीवाला ह्या भोंदूने तंत्रमंत्र, तंत्र विद्या करून जमिनीतून सोन्याचा हंडा काढून देतो, गंभीर आजार बरे करतो, दैवी तोडगे करून व्यसन सोडवतो अशा प्रकारच्या अंधश्रद्धेतून थापा मारून, भीती दाखवून नाशिक मधील एका महिलेचे तब्बल १५ वर्षे लैंगिक शोषण केले.

तंत्र विधी करून नवऱ्याची दारू सोडवितो, तसेच माझे जर ऐकले नाही तर कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू होईल, अशा प्रकारची भीती दाखवून ह्या महिलेची ५० लाख रुपयांची फसवणूक ही केली. याबद्दल इंदिरानगर पोलीस ठाण्यामध्ये दोन दिवसांपूर्वी या भोंदूविरोधात गुन्हा दाखल झालेला आहे. मात्र या गुन्ह्यांमध्ये जादूटोणाविरोधी कलम लावलेले नाही. म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नाशिक व निफाड शाखेच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक इंदिरानगर पोलीस स्टेशन तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड यांना निवेदन देण्यात आलेले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, या भोंदूला डिसेंबर २०२० मध्ये सुद्धा अटक झालेली होती. त्यावेळीही अंनिसतर्फे कडक कायदेशीर कारवाई करण्याकामी





पोलिसांना विनंती केलेली होती.

मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतरही या भोंदूने मागील पाच वर्षांत धारणगाव (खडक) येथे २५ ते ३० कोटी रुपये खर्च करून कामाख्या देवीचे मंदिर उभारण्याचे काम सुरू केल्याचे समजते. लोकांना अध्यात्माच्या नावाने किंवा अंधश्रद्धेच्या माध्यमातून उपाय, उपचार करणे तसेच विविध प्रकारची दैवी शक्ती, चमत्कार वा तत्सम भीती दाखवून त्याने लोकांकडून मोठमोठ्या रकमा उकळल्या असण्याची दाट शक्यता आहे. म्हणून पोलिसांनी सध्या फरार असलेल्या ह्या भोंदूबाबाचा कसून शोध घ्यावा. त्याला व त्याच्या साथीदारांनाही लवकरात लवकर ताब्यात घ्यावे. तो पुन्हा निसटणार नाही, याची संपूर्ण काळजी घ्यावी.

यापूर्वी ह्या टोळीने अंधश्रद्धेच्या माध्यमातून अनेकांना फसवून त्यांचे विविध प्रकारे शोषण केले असण्याची दाट शक्यता आहे,असे अंनिसचे मत आहे. त्याने यापूर्वी लोकांच्या अगतिकतेचा आणि श्रद्धेचा गैरफायदा घेऊन,कुठे कुठे,काय ,काय काळे धंदे केलेले आहेत, तेही समाजासमोर आणावेत. जेणेकरून समाज भोंदूबाबांच्या मागे लागणार नाही.

धारणगाव (खडक) येथील कामाख्या देवी मंदिरात व आसपास अंधश्रद्धांच्या आधारे लोकांच्या विविध गंभीर समस्या वर उपाय, उपचार करावयाच्या सर्व आक्षेपार्ह वस्तू, गैरप्रकार केल्याचे पुरावे जमा करावेत. जेणेकरून या भोंदूला आणि त्याच्या सर्व साथीदारांना जादूटोणाविरोधी कायदा तसेच इतर आवश्यक कायद्यानुसार कडक कायदेशीर कारवाई करणे शक्य होईल. त्यामुळे बडेबाबा उर्फ पाथर्डी वाला यांच्यासह इतर सर्व सहभागी साथीदारांना जबर शिक्षा होईल. परिणामी परिसरातील भोंदूगिरीला मोठ्या प्रमाणात आळा बसू शकेल.निवेदनावर महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ.टी.आर. गोराणे, राज्य कार्यवाहक कृष्णा चांदगुडे ,जिल्हा बुवाबाजी विरोधी संघर्ष सचिव महेंद्र दातरंगे, निफाड तालुका अध्यक्ष डॉ.उत्तमराव डेर्ले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पाटणमध्ये दि.२५ नोव्हेंबर रोजी श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्याचे आगमन



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळ्याचे पाटण शहरात मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी आगमन होत आहे. सायंकाळी ४ वाजता झेंडाचौकातून या पालखी सोहळ्याचे आगमन व मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी पाटण शहरातील सर्व स्वामी भक्तांनी मोठ्यासंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन गणेश बिचकर यांनी केले आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट या धर्मादाय संस्थानच्यावतीने श्री स्वामी समर्थ महाराजांची पालखी पादुका परिक्रमा प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आयोजित केली आहे. ही २९ वी पालखी पादुका परिक्रमा आहे. त्यानुसार श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमेचा मार्गही निश्चित केला आहे. त्याप्रमाणे श्री स्वामींच्या प्रासादिक पादुका पाटण शहरात मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता मुक्कामी येणार आहेत. पाटण शहरातील झेंडाचौकातून सायंकाळी ४ वाजता या पालखी सोहळ्याचे आगमन व मिरवणुकीस सुरूवात होईल.पालखी सोहळा चाफोलीरोड, विक्रमनगर (पाटण) येथील गणेश बिचकर यांच्या कृपासिंधू निवासस्थानी पोहोचल्यानंतर रात्री ७.३० वाजता आरती, रात्री ८ नंतर महाप्रसाद, ८.३० ते १०.३० कीर्तन असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या स्वामी सेवेचा लाभ परिसरातील भाविक-भक्तांनी घ्यावा, असे आवाहन ही गणेश बिचकर यांनी केले आहे.

# बल्लारपूर येथे दिवाणी न्यायालय नूतन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** संविधानाने आपल्याला मुलभूत अधिकार दिले आहेत. हे अधिकार शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी न्यायिक अधिका-यांची आहे. नवीन होणारी इमारत सोयीसुविधा युक्त आणि सुसज्ज असली तरी शेवटच्या घटकाचा विचार करून न्यायदान करणे, हेच आपले कर्तव्य आहे, असे विचार मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी व्यक्त केले.बल्लारपूर येथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) नूतन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आणि कोनशिला समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अनिल पानसरे, न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर, चंद्रपूरच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृद्धि भिष्म, बल्लारपूर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड ईनायत सय्यद, बल्लारपूरच्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) सोनिया सावळेश्वरकर उपस्थित होते.बल्लारपूर येथील ऐतिहासिक कार्यक्रमाला उपस्थित असणे, हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे, असे सांगून न्यायमूर्ती किलोर म्हणाले, पैसा नाही म्हणून गरिबाची केस नाकारू नका. अशा लोकांना न्याय मिळवून देणे, ही आपली जबाबदारी आहे.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शेवटच्या घटकाला केंद्रबिंदू मानून न्यायदान करा. 'तारीख पे तारीख' मागणारे वकील आज खूप आहेत. मात्र लवकरात लवकर न्याय देण्यासाठी चांगले वकील आणि न्यायाधीशांची व्यवस्थेला गरज आहे. सर्वसामान्य लोकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे, म्हणूनच आपल्याला मान सन्मान मिळतो. हा विश्वास कायम टिकविण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावे.

जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती भिष्म म्हणाल्या, न्यायालयाची ऐतिहासिक वास्तू बल्लारपूर मध्ये उभी राहत आहे. बल्लारपूरला सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा आहे. न्यायालयाच्या इमारतीची कमतरता होती ती आज पूर्ण होत आहे.

**वेळेत आणि गुणवत्तापुर्वक काम करा – न्यायमूर्ती अनिल पानसरे**

बल्लारपूर येथे सन २००८ मध्ये फौजदारी आणि दिवाणी न्यायालयाची



स्थापना झाली. तेव्हा भाड्याच्या इमारतीमध्ये हे न्यायालय होते. सन २०१० पासून न्यायालयासाठी जागेचा शोध सुरू झाला, आज ती पूर्णत्वास येत आहे. या इमारतीचे बांधकाम २०२७ मध्ये पूर्ण होईल, असे नियोजन आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळेत आणि गुणवत्तापूर्वक काम करावे, अशा सुचना न्यायमूर्ती अनिल पानसरे यांनी दिल्या.

**जलद गतीने न्याय मिळण्यास मदत होईल – न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर**

'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेनुसार प्रत्येक तालुक्यात आणि दुर्गम भागात न्यायालयीन इमारती उभ्या राहत आहे. बल्लारपूर मध्येही उत्तम दर्जाची इमारत उभी होईल. शेवटच्या घटकाला न्याय देऊ, तेव्हाच खरे न्यायदान होईल. या इमारतीमधून वकील आणि न्यायाधीशांच्या सहभागाने जलद गतीने न्याय देण्यास मदत होईल, अशी अपेक्षा न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर यांनी व्यक्त केली.

**अशी राहील न्यायालयाची इमारत**

३६ कोटी ७३ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणारी ही इमारत तळमजला अधिक तीन मजले अशी साकारण्यात येणार आहे. तळमजल्यावर साक्षदार केंद्र, समुपदेशन कक्ष, लोक अदालत कक्ष, चौकीदार कक्ष. पहिल्या माळ्यावर २ कोर्ट हॉल, २ न्यायाधीश कक्ष, प्रशासकीय कामाकरीता कार्यालयीन कक्ष. दुसऱ्या माळ्यावर दोन कोर्ट हॉल, दोन न्यायाधीश कक्ष, दोन अधिवक्ता कक्ष, ग्रंथालय, मध्यस्थी कक्ष, सहायक सरकारी अभियोक्ता कक्ष आणि तिसऱ्या माळ्यावर व्ही.सी. रूम, सभा कक्ष, न्यायाधीश ग्रंथालय, अभिलेखागार कक्ष राहणार आहे.

## नागपूर येथे शिंपी समाजाचे भव्य अधिवेशन दि.१७ व १८ जानेवारी २०२६




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** नागपूर येथे होणाऱ्या संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता महासंमेलनाची माहिती देण्यासाठी नाशिक येथील शिंपी समाजाचे प्रमुख आयोजक विंचूर येथे भेटीस उपस्थित राहिले. शिंपी समाज व पोटजातींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तसेच राज्य आणि केंद्र सरकारकडून विविध प्रलंबित मागण्या मंजूर करून घेण्यासाठी अखिल भारतीय सर्व शिंपी समाज बांधवांच्या वतीने दिनांक १७ व १८ जानेवारी २०२६ रोजी नागपूर येथे दोन दिवसीय भव्य महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनासाठी देशभरातील शिंपी समाज बांधवांनी एका छत्राखाली मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले.

**महासंमेलनाचे उद्दिष्ट :-** या परिषदेतून -शिंपी समाजाचा आर्थिक, सामाजिक व आध्यात्मिक विकास, विविध जाती-पोटजातींमध्ये ऐक्य, भारतातील तसेच परदेशातील शिंपी समुदायाचे एकत्रीकरण, सरकारकडून मागण्या मान्य करण्यासाठी प्रभावी पाठपुरावा, हे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देण्यात येणार आहे.

**परिषदेसंबंधी महत्त्वाची माहिती :-** या भव्य परिषदेचा अधिकृत लोगो केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नुकताच प्रकाशित करण्यात आला. संमेलनासाठी भारताचे पंतप्रधान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, तसेच केंद्रीय मंत्री उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून हे महासंमेलन यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नाव नोंदणी व संपर्क प्रवीण पवार (नाशिक) मोबा.८८८८३२१९२७, दत्ताभाऊ वावधाने मोबा.९०७५२४३८५०, अतुल मानकर मोबा.९३७३९०४५६१, नाशिक जिल्ह्यातील सर्व समाजबांधवांनी वरील आयोजकांकडे तात्काळ नाव नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

विंचूर येथील बैठकीस उपस्थित मान्यवर नाशिक येथील प्रवीण पवार, दत्ता वावधाने, अतुल मानकर, राजेंद्र करमासे, रमेश चांडोले तसेच विंचूरचे कीरण नवले, विजय क्षिरसागर, पत्रकार सुनील क्षिरसागर, अमोल कल्याणकर, सुयेश कल्याणकर, अर्जुन कल्याणकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.


# शहराध्यक्ष कैलास गोडसे व तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस नबी साब यांचा राजीनामा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड नगरपरिषद निवडणुक आगामी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी कॉंग्रेसची उमेदवारी देत असताना कॉंग्रेसचे अध्यक्ष व तालुका कार्याध्यक्ष यांना विश्वासात न घेता आपल्या मर्जीप्रमाणे पक्षश्रेष्ठीने मुदखेड पालिका निवडणुकीचे बी फार्म दिल्यामुळे संतप्त झालेल्या कॉंग्रेसचे शहराध्यक्ष कैलास गोडसे व तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस नबी साब यांनी आपल्या पक्षाचा राजीनामा



पक्षश्रेष्ठीकडे पाठविल्यामुळे कॉंग्रेसमध्ये



मोठा राजकीय भूकंप झाला आहे. दिवंगत खासदार कै. वसंतराव चव्हाण व खासदार रवींद्र चव्हाण यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत मुदखेड शहरांतून भाजप पेक्षा अधिकची मताधिक्याची लीड कॉंग्रेस पक्षाच्या पदरात पाडून चव्हाण यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले निष्ठावंत कॉंग्रेस कार्यकर्त्यांना उमेदवारी टिकटा वरून डावल्यामुळे कॉंग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे व कॉंग्रेस तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस यांनी राजीनामा दिला आहे.